INDIAN NATIONAL CONGRESS

नाना पटोले
अध्यक्ष

# महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी

टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०२५.
Email - office@mahacongress.com

दुरध्वनी -२४२३३०००
२४३०१३०१
२४३०१३६१
फॅक्स - २४२२५७३३

जावक क्र.४५८/२०२४ दि. १७ जुलै, २०२४

प्रति,

**मा. श्री. एकनाथजी शिंदे,**

मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य,

मंत्रालय, मुंबई

**विषय – विशाळगडावरील अतिक्रमणाच्या नावाखाली गजापूर येथे दंगल करणाऱ्यांवर कारवाई करणेबाबत..**

महोदय,

महाराष्ट्र ही साधू संतांची थोर पुरुषांची, विचारवंत व समाज सुधारकांची भूमी आहे. शिव - शाहू - फुले - आंबेडकरांच्या विचारांवर चालणारे पुरोगामी राज्य अशी महाराष्ट्राची फक्त देशातच नाही तर जगात ओळख आहे. विविध जाती धर्मांचे लोक राज्यात गुण्यागोविंदाने राहत आहेत, पण गेल्या काही दिवसांपासून आपल्या राजकीय फायद्यासाठी प्रक्षोभक वक्तव्ये करून राज्यात हिंदू मुस्लीम तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न जाणिवपूर्वक सुरु आहे. सत्ताधारी पक्ष आणि सत्तेत असणा-या काही मंडळींकडून याला पाठबळ मिळत आहे हे अत्यंत दुर्देवी आहे.

विशाळ गडावरील अतिक्रमणे काढली पाहिजेत याबाबत कोणतेही दुमत नाही. आपले दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा गड किल्यांचा वारसा जपलाच पाहिजे. अतिक्रमणाचे हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे, न्यायालयातील सुनावणीवेळी सरकारी वकील उपस्थित नसतात, सरकार पक्षाकडूनच वेळकाढूपणा केला जात असताना, अचानक अशा काही हालचाली करून अतिक्रमणचा मुद्दा पेटवला गेला. विशाळगडावरील अतिक्रमणाच्या नावाखाली १४ तारखेला विशाळगडापासून ४ किलोमीटर दूर असलेल्या गजापूर गावातील एका धर्माच्या लोकांच्या घरांवर हल्ले करून जाळपोळ आणि लोकांना मारहाण करण्यात आली. हा प्रकार माणुसकीला काळीमा फासणारा आहे. काँग्रेस पक्ष या हिंसाचाराचा तीव्र निषेध करत आहे.

माजी खासदार छत्रपती संभाजीराजे यांनी विशाळगडावरील अतिक्रमणे काढण्यासंदर्भात हाक दिली होती. त्यासाठी हजारो तरुण विशाळगडाकडे येणार आहेत. याची

INDIAN NATIONAL CONGRESS
नाना पटोले
अध्यक्ष
# महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी
टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०२५.
Email - office@mahacongress.com
दुरध्वनी - २४२३३०००
२४३०१३०१
२४३०१३६१
फॅक्स - २४२२५७३३

कल्पना असूनही प्रशासन आणि पोलिसांनी योग्य ती खबरदारी घेतली नाही. त्यामुळे विशाळगडाच्या पायथ्याला असणा-या गजापूर गावातील ४० ते ५० घरांना दंगोखोरांनी लक्ष करून हल्ला केला व तोडफोड आणि जाळपोळ केली यात अनेक लोक जखमी झाले. घरांचे, दुकानांचे, मालमत्तेचे व वाहनांचे प्रचंड नुकसान झाले आहे. त्यांना सरकारने तातडीने मदत केली पाहिजे तसेच गावकरी प्रचंड दहशतीत आहेत. सरकारने त्यांना सुरक्षेचा विश्वास दिला पाहिजे.

विशाळगडावरील अतिक्रमण व गजापूर गावातील दंगल हे दोन वेगळे विषय आहेत. हिंसाचार प्रकरणी सरकारने कठोर कारवाई केली पाहिजे होती, पण अद्याप तरी ती केल्याचे दिसत नाही. या प्रकरणी मा. गृहमंत्री यांनी शांतता प्रस्थापित करण्यासंदर्भात उपाययोजना व आवाहन केले पाहिजे होते पण त्यांचे यासंदर्भातील विधान हे एकप्रकारे दंगेखोरांना पाठीशी घालणारे आहे, आम्ही या घटनेचा आणि गृहमंत्र्यांच्या विधानाचाही तीव्र निषेध करतो. १४ जुलै रोजी जो हिंसाचार झाला ते सरकार आणि प्रशासनाचे फक्त अपयशच नाही तर प्रशासनाच्या पाठबळाने झालेला गुन्हा आहे.

कोल्हापूरचे खासदार श्रीमंत शाहू छत्रपती आणि विधान परिषदेतील काँग्रेस पक्षाचे गटनेते आ. सतेज (बंटी) पाटील यांनी हिंसाचारग्रस्त भागात जाऊन पाहणी केली व स्थानिक नागरिकांशी चर्चा करून त्यांना आधार दिला. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष व माजी मंत्री नसीम खान यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाने राज्याच्या पोलीस महासंचालकांची भेट घेऊन दंगेखोरांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. पण अद्याप सरकारतर्फे कोणीही येथे पोहोचले नाही किंवा मदतही पोहोचली नाही हे अत्यंत दुर्दैवी आहे.

राजर्षी शाहू महाराज यांनी सर्व जाती धर्मांना सोबत घेऊन राज्य केले म्हणूनच त्यांना लोकराजे म्हणतात पण त्यांच्या करवीर नगरीत सामाजिक सलोखा बिघडवण्याचे पाप केले जात आहे आणि तेही केवळ राजकीय फायद्यासाठी केले जात आहे, हे अत्यंत दुर्दैवी आणि चिंताजनक आहे. राज्यात सरकार पुरस्कृत सुरु असलेला मराठा आणि ओबीसी समाजातील वाद

नाना पटोले
अध्यक्ष

# महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी

टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०२५.
Email - office@mahacongress.com

दुरध्वनी -२४२३३०००
२४३०१३०१
२४३०१३६१
फॅक्स - २४२२५७३३

आणि आता विशाळगड हिंसाचाराचे प्रकरण या महाराष्ट्राला काळीमा फासणा-या घटना आहेत. गेल्या काही दिवसांपासून सत्ताधारी पक्षाचे काही आमदार आणि नेते जाणिवपूर्वक चिथावणीखोर विधाने करून सामाजिक सलोखा बिघवण्याचा प्रयत्न करत आहेत. इतर राज्यातील टी. राजा यांच्यासारख्या आमदार व नेत्यांना राज्यात बोलावून प्रक्षोभक वक्तव्ये केली जात आहेत. राज्यात सामाजिक सलोखा व शांतता रहावी यासाठी राज्याचे प्रमुख म्हणून अशा अपप्रवृत्तींना पायबंद घालण्याची आपली जबाबदारी आहे. कोणी राजकीय फायद्यासाठी धर्माच्या नावाखाली राज्यातील वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न करत असेल तर जबाबदार विरोधी पक्ष म्हणून काँग्रेस ते कदापी खपवून घेणार नाही. राजकारण बाजूला ठेवून महाराष्ट्राच्या हितासाठी या अपप्रवृत्तींना ठेचून काढावे ही अपेक्षा आहे.

धन्यवाद

आपला

**(नाना पटोले)**

प्रत- **मा. देवेंद्र फडणवीस,** गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य.